रेग्यु. दिवाणी मु.नं.१३३/२१
आबासाहेब शिंदे वि. महादेव शिंदे
CNR NO.MHST140013642021

<u>नि. १३ खालील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत हा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ व्हावा म्हणुन दाखल केला आहे. प्रस्तुतचे अर्जासोबत प्रतिवादींनी शपथपत्र दाखल केले आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे की वादी यांनी प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीचे वाटप व अन्य बाबी मंजुर होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादींना दावा मान्य व कबुल नाही. प्रतिवादींचे पुढे म्हणणे की जगभरात कोरोना व्हायरसचा प्रादूभाव झालेमुळे व्यवहार ठप्प झाल्याने प्रतिवादींना दाव्यासंबंधी आवश्यक कागदपत्रे काढता आली नाहीत. त्यामुळे त्यांना मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादीची कैफियत दाखल होणे न्यायाचेदृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादीची कैफियत देणेची संधी मिळाल्यास वादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. उलट कैफियत दाखल करुन घेतल्यास न्यायदानास मदत होईल.

३. वादी यांनी अर्जास आक्षेप घेतला असुन त्यांचे म्हणणे की अर्जातील संपुर्ण मजकूर हा खोटा असुन कुठलेही योग्य खुलासा प्रतिवादींनी केला नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा तसेच कॉस्टची रक्कम रु.५०००/- करण्यात यावी अशी विनंती केली.

४ अर्ज वाचला युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीसंदर्भात वाटप होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखानुसार प्रतिवादी क्र.१, २ व ६ यांना दाव्याचे समन्स लागुन दि.२६/१०/२०२१ रोजी विधीज्ञामार्फत हजर झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादींना वेळोवेळी संधी देवुन देखील त्यांनी कैफियत दाखल केली नाही म्हणुन दि.२८/१/२०२२ रोजी विनाकैफियतचा आदेश पारीत झाल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. प्रतिवादींच्या कथनानुसार कोरोना व्हायरसचे प्रार्दभावामुळे प्रतिवादींना आवश्यक कागदपत्रे हस्तगत करता आली नाहीत. त्यामुळे कैफियत दाखल करता आली नाही. मार्च २०२० ते ऑगष्ट २०२१ पावेतो कोरोना आजारामुळे न्यायालयाच्या कामावार मर्यादा होत्या त्यानंतरदेखील काही प्रमाणात शासकीय कार्यालयात देखील मर्यादा होत्या त्यामुळे प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक वाटतात. प्रस्तुतचा अर्ज हा दि.२३/२/२०२२ रोजी दाखल केला

आहे. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे न्यायाचेदृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. दावा हा गुणागुणावर चालणेसाठी तसेच भविष्यात कुठलीही तांत्रीक अडचण राहु नये म्हणुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे वादी यांना प्रस्तुतचे अर्ज दाखल केल्यामुळे नाहक त्रास झाला म्हणुन प्रस्तुतचा अर्ज काही कॉस्टच्या अटीवर मंजुर होणेस पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज नि.१३ हा वादी यांना रक्कम रु.३००/-रु. कॉस्ट या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांची कैफियत ही अर्जाची पुर्तता केल्यानंतर अभिलेखावर घेणेत येते.

फलटण. (पं. हि. पाटील)

ता.१/१२/२०२२. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर फलटण.